अभ्यासातील सातत्य, चिकाटी हे स्पर्धा परीक्षेतील यशाचे गमक- श्री रंगनाथ कचरे

"आय.बी.पी.एस. मार्फत संपूर्ण वर्षभरामध्ये बारा ते तेरा वेगवेगळ्या प्रकारच्या परीक्षा घेतल्या जातात . तेवढ्या प्रकारच्या वेगवेगळ्या संधी विद्यार्थ्यांना निर्माण होतात, विद्यार्थ्यांनी अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास व चिकाटीने मेहनत केल्यास यशाला गवसणी घालता येते." असे मत श्री. रंगनाथ कचरे, मार्केटिंग इन्चार्ज, बँक ऑफ इंडिया, कोल्हापूर यांनी व्यक्त केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'स्पर्धा परीक्षा तयारी' विषयावर आधारित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये बोलत होते." पुढे ते म्हणाले श्रेणी एक पासून श्रेणी तीन, चार पर्यंतच्या अधिकारी पदावर विराजमान व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी इंग्रजी, गणित व बुद्धिमत्ता या विषयाचा सखोल अभ्यास आणि सराव केला पाहिजे, तसेच प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तिन्ही परीक्षांचे सुयोग्य नियोजन केले पाहिजे. बँकिंग परीक्षा संदर्भात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, कालावधी, गुण, विषय, उत्तीर्ण होण्यासाठीची मर्यादा, वयोमर्यादा, प्रयत्नांची मर्यादा, इत्यादी संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यशाळेमध्ये दोन सत्र होते. पहिल्या सत्रासाठी श्री. रंगनाथ कचरे व त्यांचे सहकारी श्री. विनायक कांबळे व श्री. अनिल चाळके हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. विद्यार्थ्यांनी स्वतःचे स्वॉट (SWOT) विश्लेषण करावे, स्वतः मधील बलस्थाने, दुर्बलस्थाने ओळखून दुर्बल स्थानांचे रूपांतर बलस्थानात करण्यासाठी प्रयत्न करावे, प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करावा असे सूचक वक्तव्य श्री. विनायक कांबळे यांनी केले. बँकेची परीक्षा का द्यावी याचे महत्त्व पटवून देताना बँकेमध्ये मिळणारा पगार, पगारा व्यतिरिक्त मिळणारे इतर भत्ते, सोयी-सुविधा, प्रतिष्ठा, याचे दाखले दिले. बँकिंग परीक्षेसाठी अरिहंत व इतर महत्त्वाचे पब्लिकेशन्स ची पुस्तके विद्यार्थ्यांनी अभ्यासावी, Adda 24 App वापरावे, मोबाईलचा वापर सोशल मीडिया किंवा इतर निरुपयोगी गोष्टींसाठी न करता सामान्य ज्ञान व चालू घडामोडी जाणून घेण्यासाठी इंटरनेट व गुगलचा वापर केल्यास जलद ध्येय साध्य करता येईल असे ते म्हणाले. तर कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये एम.पी.एस.सी. व यू.पी.एस.सी. परीक्षे संदर्भात माहिती देण्यासाठी श्रद्धा अकॅडमी येथील सौ. सुप्रिया कौंदाडे व सौ. संगीता पोवार प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. सुप्रिया कौंदाडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एमपीएससी व यूपीएससी परीक्षे संदर्भात माहिती दिली. प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये या परीक्षा होत असतात ही परीक्षा किती गुणांची असते, स्वरूप काय असते, कालावधी किती असतो, राजपत्रित पदे व अराजपत्रित पदे म्हणजे काय याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन जीवनात असतानाच विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने बाळगणे आवश्यक आहे संपूर्ण दिवसाचे, तासाचे नियोजन विद्यार्थ्यांनी केले पाहिजे असे त्या म्हणाल्या. मुलाखतीची तयारी कशी करावी, कोणते प्रश्न मुलाखतीमध्ये विचारले जातात, मुलाखतीमध्ये नेमकं तुमच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये काय बघितलं जातं, तुमचे वर्तन, हावभाव, आत्मविश्वास, प्रशासकीय सेवेसाठी आवश्यक कौशल्य, संवाद कौशल्य, पेहराव या सर्व गोष्टींचे बारीक निरीक्षण मुलाखतीमध्ये तज्ञ लोकांच्याकडून केले जाते. देशाची सेवा करायची म्हणून या क्षेत्राकडे वळा आपोआप तुम्हाला प्रेरणा मिळेल. पद, प्रतिष्ठा, लाल दिव्याची गाडी, पैसा यापेक्षा देशसेवा करण्याची संधी, देश चालवण्याची संधी, देशाच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडण्याची संधी या दृष्टीने या स्पर्धा परीक्षांकडे बघा असे त्यांनी आश्वासन केले. तर मन, मेंदू व मनगट यांची ताकद एकत्र करून अभ्यास करा म्हणजे स्पर्धा परीक्षेमध्ये यशाची खात्री नक्की यात

शंका नाही असे मत महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केले. तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अग्रणी महाविद्यालय योजनेच्या समन्वयिका डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी केले. कार्यशाळेच्या सुरुवातीस श्री. टी. एन. मुल्ला यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. मोहिनी आंचलिया यांनी सूत्रसंचालन केले व कार्यशाळेच्या शेवटी श्री. एस. बी. मलघाण यांनी आभार मानले. सदर कार्यशाळेसाठी रूकडी, पेठ वडगाव, हुपरी, इचलकरंजी येथील महाविद्यालयातून प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित झाले होते.

